दैनिक सागर रायगड Raigad

। शनिवार दिनांक ४-५-२०१९

for news: news @dailysagar.com for ads: advt@dailysagar.com

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबईसह पाच स्वतंत्र आवृत्त्या

# नाविन्यपूर्ण मत्स्य संवर्धन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

रोहे (वार्ताहर) :- कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा मार्फत रायगड जिल्ह्यात विविध विस्तार उपक्रम राबविले जातात. याच अनुषंगाने दि.२९/०४/२०१९ ते ३०/०४/२०१९ दोन दिवसांचा मौजे पुई कॉलनी, पो.पुगाव, ता.रोहा, जि.रायगड येथे नाविन्यपूर्ण मत्स्यसंवर्धन तंत्रज्ञान या महत्वाच्या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस.डी.नाईक, विभाग प्रमुख, मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी तर अध्यक्ष म्हणून डॉ.मनोज तलाठी, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, किल्ला रोहा, रायगड यांची उपस्थिती लाभली. तसेच सदर कार्यक्रमास तांत्रिक मार्गदर्शक म्हणून डॉ. एस. डी. नाईक, डॉ.बी.आर.चव्हाण, डॉ.एस.जे.मेश्राम, डॉ. आर.एम. तीबीले व जी.एस.घोडे, मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी, तसेच प्रा.माधव गित्ते, विषय विशेषज्ञ (मत्स्यशास्त्र) कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा, रायगड आणि हसन म्हसलाई व राजन झेमसे प्रगतशील शेतकरी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. प्रा.माधव गित्ते यांनी सदर प्रशिक्षण वर्गाचे महत्व आपल्या प्रास्ताविकात



रोहा येथे नाविन्यपूर्ण मत्स्यसंवर्धन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण वर्गाचेवेळी मार्गदर्शन करताना व उपस्थित प्रमुख पाहुणे

यांनी गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनाची सद्यस्थिती आणि भवितव्य व तसेच नाविन्यपूर्ण मत्स्य संवर्धन तंत्रज्ञान या विषयाचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या तांत्रिक सत्रामध्ये शास्त्रज्ञांकडून बायोफ्लॉक तंत्रज्ञान, रिसर्क्युलेटरी ॲक्वाकल्चर सिस्टिम तंत्रज्ञान, ॲक्वापोनीक्स तंत्रज्ञान, माशांचे रोग व निदान, वाढ खुंटलेल्या बोटुकलीचे उत्पादन तंत्रज्ञान, एकलिंगीय तिलापिया मासे संवर्धन तंत्रज्ञान, मत्स्य संवर्धनात खाद्य व पाणी व्यवस्थापनाचे महत्व या विषयाचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रगतशील शेतकरी हसन म्हसलई यांच्या प्रक्षेत्रास भेट देऊन प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास बहुसंख्य मत्स्य शेतकरी व तरूणवर्ग उपस्थित होता. दुसऱ्या सत्रात शास्त्रज्ञांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. उपस्थित शेतकऱ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.जीवन आरेकर यांनी केले.